# इगतपुरी नगरपरीषद इगतपुरी, जिल्हा – नाशिक

igatpurimun@gmail.com / www.igatpurinagarparishad.org

मुख्याधिकारी कार्यालय दुरुध्वनी क्र. 02553 244398, फॅक्स क्र. - 02553 244399

जा. क इनप/बांध/०४/ स.नं३९७/१/अंतिम रेखांकन मजुरी / १८ /२०१८ दिनांक:-१४/०५/२०१८

प्रती,

श्री.अजिंक्य रविंद्र पवार व ईतर ४ ,

रा.विनयनगर,नाशिक .

विषय:-मौजे तळेगाव ता.इगतपुरी जि.नाशिक येथील स. नं.३९७/१ क्षेत्र १७३३० चौ.मी. क्षेत्रातील निवासी प्रयोजनार्थ अंतिम अभिन्यासास परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ:- १ .इकडील पत्र क्र.इनपा/बांध/०४/गट नं /३९७/१/ रेखा/ मं.शि/१४/१५दिनांक ११.०६.२०१५

२.म.सहायक संचालक ,नगर रचना विभाग नाशिक यांचेकडील आदेश क्र.तळेगाव ता.इगतपुरी गट नं ३९७/१ संसना/१७३७ दि.२४.०८.२०१५

३ .इकडील पत्र क्र. इनपा/बांध/०४/गट नं /३९७/१/ अंतिम रेखांकन /२३१/१८ दिनांक १३.०४ .२०१८

४.म.सहायक संचालक ,नगर रचना विभाग नाशिक यांचेकडील आदेश क्र.जा.क्र.अंतिम अभिन्यास/मौजे तळेगाव ता.इगतपुरी /स न ३९७/ /ससंनरना /११३७ दिनांक २७/०४/२०१८

मौजे तळेगाव ता.इगतपुरी जि.नाशिक येथील स न.३९७/१ क्षेत्र १७३३०चौ.मी. क्षेत्रातील निवासी प्रयोजनार्थ अंतिम अभिन्यासास परवानगी मिळणेबाबत तुम्ही अंतिम सिमांकित मोजणी नकाशामध्ये भू. क्र. १३ सन्मुख असलेल्या अस्तित्वातील ६ मी.रुंद रस्त्याचे प्रस्तावित ९.००मी. रुदिकरणाने होणा-या रुदिकरणाखालील क्षेत्र अंतिम सिमांकित मोजणी नकाशावर स्वतंत्ररीत्या दर्शविले नसल्याने तुमच्या दिनांक २६/०४/२०१८ च्या पत्रान्वये तुम्ही खालीलप्रमाणे खुलासा केला आहे .

प्रस्तुत प्रकरणातील अभिन्यासामध्ये भू.क्र .१३ समोरील ६.००मी रूद रस्त्यास ९.००मीटरचे रुदिकरण करण्यात आलेले आहे . भू.क. १३ समोरील रस्त्याच्या रुदिकरणाचे क्षत्र अतर्गत रस्त्यात समाविष्ठ केलेलंआहे त्यामुळे स्वतत्ररीत्या सदरचे रुदिकरणाखालील असलेले क्षत्र वेगळे दर्शविले नाही सदर बाब विचारात घेवून मौजे तळेगाव ता.इगतपुरी जि.नाशिक येथील स. न.३९७/१ क्षेत्र १७३३० चौ.मी. क्षेत्रातील निवासी प्रयोजनार्थ अंतिम अभिन्यासास खालील अटी शर्तीस अधीन राहून अतिंम मजुरी देण्यात आहे .

अभिन्यासातील भूखडाचा वापर रहिवास कारणासाठीच करण्यात यावा

**अटी आणि शर्ती:-**

१)अभिन्यासातील कोणत्याही रस्त्याची रुंदी मंजूर अभिन्यासाप्रमाणे कायम ठेवण्यात यावी .व सर्व रस्ते पक्क्या स्वरूपात रहदारीला योग्य होतील अशा स्वरूपात तयार करण्यात यावेत .तसेच सादर रस्ते रुपये ०१/- या नाममात्र मोबदला रकमेवर सबंधित नियोजन प्राधिकरण /नगर परिषदेकडे हस्तांतरीत करणे बधनकारक राहील.

२) अभिन्यासातील प्रस्तावित खुली जागा ही अभिन्यासातील सर्व भूखंडधारक /इमारतीमधील रहिवासी याच्या सामाहिक वापरासाठी राहील आशा आशायाचे बधपत्र (Undertaking )जमीन मालकाने द्यावे लागेल

अ) विकास परवानगी मजूर झाल्यानतर खुली जागा सोसायटी /रहिवाश्यांची सघटना याच्याकडे वर्ग झाल्याचे मानण्यात येईल .जर अशी सोसायटी / सघटना अस्तित्वात आलेली नसेल तर त्यावेळी सदर खुल्या जागेचा कब्जा/ ताबा हा नियोजन प्राधिकरण किवा जिल्हाधिकारी याच्याकडे अशी सोसायटी /संघटना अस्तित्वात येई पर्यत राहील . खुली जागा ईतर कोणत्याही व्यक्तीस विक्री करता येणार नाही आणि रहिवाशांच्या सामाईक वापराव्यतीरीक्त ईतर कोणत्याही वापरासाठी ठेवता येणार नाही .

ब) खुल्या जागेचा गैर वापर होत आहे असे नियोजन प्राधीकरणाच्या निदर्शनास आणून देण्यात आले , तर नियोजन प्राधिकरण सदर खुल्या जागेचा ताबा घेईल.

क)शासनाने दिनांक २१/११/२०१३रोजी राज्यातील नगरपरीषदा व नगरपंचायतीसाठी साठी मजूर केलेल्याविकास नियत्रन व प्रोत्साहान नियमावली मधील तरतूद क. २.९मध्ये नमूद वापर सुविधा भूखड मध्ये ( Amenity Space ) अनुज्ञेय राहतील

३)सर्व नियोजित रस्त्यांना योग्य प्रकारची गटारे बाधण्यात येवून भूखंडामधील सांडपाण्याच्या निचरा योग्यरीत्या करण्याची व्यवस्था अर्जदाराने केली पाहिजे

४) अभिन्यासातील नियोजित केलेल्या रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्याची तसेच वाढविण्याची जबाबदारी अर्जदाराने घेतली पाहिजे.

५) अभिन्यासातील कोणत्याही भूखंडाची उपविभागणी पूर्व परवानगी शिवाय करण्यात येऊ नये.

६ )अभिन्यासतील रस्ते जर लगत जमिनीस पोच रस्ते म्हणून उपलब्ध होत असल्यास अस्या रस्त्यालगतच्या जमिनीस संभाव्य अभिन्यासातील रस्त्यांना ते जोडण्याची व वापरण्याची परवानगी घ्यावी लागेल.

७) सदर अभिन्यासातील जागेत सांडपाणी अथवा भूपृस्सिट पाणी वाहून नेण्यासाठी जे नैसर्गिक मार्ग असतील ते अबाधित ठेवावे अथवा त्याची पर्यायी व्यवस्था करणे अर्जदारावर बंधनकारक आहे.

०८) वरील पूर्तते व्यतिरिक्त अभिन्यास परवानगी दिल्या ताखेपासून एक वर्षांच्या आत अर्जदारास खालील बाबींची पूर्तता करावी.

अ ) जमीन उंच सखल असल्यास ति योग्य प्रकारे समान पातळीवर आणणे.

ब ) नियोजन रस्त्यात नाले,वोहोळ,ई असल्यास त्यावर सार्वजनिक वापरासाठी पूल बांधणे.

क)विजेचे अथवा,दूरध्वनीचे स्तंभ जे भूखंडात अथवा रस्त्यात येत असल्यास , सबंधित खात्याकडे आवश्यक खर्च भरून त्याची फेर आखणी करून रस्त्यांचे बाजूला घेणे.

ड) अभिनयासा खालील जागेत पाणी पाणी पूरवठ्याची सोय उपलब्ध करून देणे.

०९) विषयांकित जागेस उत्तर हद्दीलगत लाग्ड्यःच्या वाडीकडे जाणाऱ्या अस्तीस्वातील ६ मी रुंद पोच रस्त्यावरून पोच रस्ता उपलब्ध होत आहे .सदर रस्त्याचे रुंदीकरण ९ मी दर्शिवले आहे.याबाबत आपले स्तरावर खातरजमा करणे आवश्यक राहील.सदर पोच रस्त्याबाबत काही वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार याची राहील.

१०) बांधकाम करतांना अभिन्यासातील प्रत्येक भूखंडात बांधकामासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार नियोजन प्राधिकरणाची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे.

११) अभिन्यासातील खुल्या अथवा अन्य जागेत झाडे अस्तित्वात असल्यास विना परवाना तोडण्यात येऊ नयेत.

१२) जमिनीची मालकी हक्क ,चतु:सीमा पोच रस्ता किवा इतर कोणत्याही कारणास्तव वाद उपस्थीत झाल्यास सर्व जबाबदारी अर्जदार याची राहील.व अभिन्यासास सुधारित मान्यता घेणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

१३) प्रस्तावित अंतिम अभिन्यास नकाशात क्षेत्र कॉलम “D ” मध्ये नमूद क्षेत्राप्रमाणे प्रत्येक भूखंडाचे ७/१२ चे उतारे तयार करणे आवश्यक असेल.

१४) प्रस्तावित अभिन्यासातून विद्युत वाहिनी जात असल्यास अर्जदार यांनी सदर विद्युत वाहिनी स्वखर्चाने रस्त्यालगत स्थलांतरित करून घेणे बंधनकारक राहील.तसेच सदर विद्युत वाहिनीच्या आखानिबाबत व सोडवयाचा समास अंतराबाबत महाराष्ट्र विद्युत वितरक कंपनी ली. यांचेकडून नाहरकत दाखला घेणे बंधनकारक राहील.

१५) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार तरतूद करा ६.८ नुसार अभिन्यासा अंतर्गतची करावयाची विकास कामे जसे रस्ते,गटारी ,पाणीपुरवठा व्यवस्था ,विद्युत दिवे व्यवस्था ,करणे विकसकास बंधनकारक राहील त्या अनुषंगाने टप्या टप्याने बांधकाम परवानगीने अनुज्ञेय राहील.

१६) विषयाकीत अभिन्यासास सुधारित परवानगी घ्यावयाची असल्यास त्याची कारणे नमूद करणे आवश्यक राहील.

१७) विषयांकित जागेस लगत मंजूर अभिन्यासातून येणाऱ्या रस्त्यावरून पोच रस्ता उपलब्ध होत नाही ,तथापि त्याबाबत आपले स्तरावर खातरजमा करणे आवश्यक आहे.तसेच सदर पोच रस्त्याबाबत भविष्यात काही वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील.

१८) महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या "चार कोटी वृक्ष लागवड " या अभियानाच्या उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने सामाजिक बांधिलकी म्हणून अर्जदार यांनी किमान प्रस्तावा अंतर्गत जागेत किमान २५ वृक्षांची लागवड करणे बंधनकारक राहील.

१९) प्रस्तावित अभिन्यास नकाशावारती अर्जदार सहमालक व संबंधित वास्तूविषारद यांनी स्वाक्षऱ्या केलेल्या असून ,सदर स्वाक्षऱ्या व मालकी हक्क या बाबत महसूल विभागाने आपले स्तरावर खात्री करणे आवश्यक आहे.

२०) अर्जदार सबंधित वास्तूविशारद/अभियंता यांनी सादर केलेली माहिती अथवा खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्यास सादर परवानगी रद्द समजण्यात येईल.

२१) भूमी अभिन्यासातील रस्त्याचे क्षेत्र ४४१५.३५ चौ मी व खुल्या जागेचे क्षेत्र १८६०.० चौ मी. या जागांवर इगतपुरी नगर परिषद यांचे नाव दाखल झाल्याशिवाय भूखंडावरील इमारत बांधकामास बांधकाम परवानगी मंजुरी केली जाणार नाही.

IGATPURI MUNICIPAL COUNCIL Est-1868

(डॉ.विजयकुमार मुंडे)

मुख्याधिकारी,इगतपुरी नगरपरिषद

प्रत:-

१.म.तहसीलदार सो।,इगतपुरी.

२.म.उप अधिक्षक,भूमी अभिलेख विभाग,इगतपुरी.

३.तलाठी,इगतपुरी

/- सोबत जोडलेल्या नकाशानुसार रस्त्याचे क्षेत्र ४४१५.३५ चौ मी व खुल्या जागेचे क्षेत्र १८६०.० चौ मी. या जागांवर इगतपुरी नगर परिषद यांचे नाव दाखल करण्यात यावे.